# गंगापूर येथे गटसाधन केंद्राला आग लागून लाखोंचे नुकसान



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.,२१: शहराच्या मध्यभागी असलेल्या गटसंधान केंद्राच्या कार्यालयात दि.२१ मार्च रोजी रेकॉर्ड रूम अभिलेख कक्षाला सकाळी साडे सात वाजता अचानक आग लागली.या आगीत कार्यालयातील टेबल,खुर्च्यासह इतर साहित्य आणि कागदपत्रे जळून खाक झाल्याने मोठे नुकसान झाले आहे.

गंगापूर वैजापूर मार्गावर असलेल्या गटसंधन केंद्राच्या कार्यालयातुन आगीचे लोन आकाशात झेपावत असल्याचे येथून जाणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास आले.संपूर्ण परिसर धुराच्या लोटांनी वेढला गेला होता.बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे या कार्यालयातील टेबल खुर्ची सह काही महत्त्वाचे कागदपत्रे ही जळून खाक झाले.

नागरिकांचे गटसंधान केंद्राच्या अधिकाऱ्यांनी रेकॉर्ड रूम विझवण्याचा प्रयत्न केला. आग लागल्यानंतर तब्बल अडीच तासाने अग्निशामक दलाच्या दोन गाड्या तेथे पोहोचल्या तोपर्यंत स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग आटोक्यात आली होती. दरम्यान आग नेमकी कशी लागली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.या आगीमुळे कार्यालयातील आतील भाग जळून खाक झाला आहे.

पंचायत समिती आवारात असलेल्या गट साधन केंद्राच्या मागील बाजूस महावितरणच्या ३३ केव्हीची उच्च दाब विद्युत वाहिनी गेली आहे.शुक्रवारी सकाळी ७:३० वाजेच्या सुमारास या तारांच्या घर्षणातून पडलेल्या ठिणगीमुळे येथील कचऱ्याने पेट घेतला.त्यानंतर ही आग गटसाधन केंद्रात पसरली.गट साधन केंद्राच्या मागे राहणारे पवन चव्हाण यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी स्थानिकांना याविषयी माहिती दिली व आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

# जिद्द,प्रामाणिक परिश्रम आणि स्वाभिमान हीच नागसेनवनाची देणगी : डॉ.सुधाकर शेंडगे


छत्रपती संभाजीनगर : नागसेवनात येणारा प्रत्येक विद्यार्थी ध्येय व स्वप्न घेऊनच शिक्षणासाठी प्रवेश घेतो, त्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येकाने आपला वेग अभ्यास व अभ्यासाशिवाय कोणत्याही कार्यात घालू नये , आपल्या ध्येयाची पूर्ती जिद्द, प्रामाणिक परिश्रम आणि स्वाभिमान हीच नागसेनवनाची खरी देणगी होय असे प्रतिपादन डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले .*

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आयोजित विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळेत बोलतांना आजीवन



शिक्षण विस्तार विभागाचे संचालक शेंडगे म्हणाले , स्पर्धा परीक्षा असो की उद्योग व्यवसाय यात बौद्धिक प्रामाणिकपणास पर्याय नाही संपती च्या जोरावर नाही तर बौद्धिक संपदेतूनच आपला संपूर्ण कायापलट होईल हे लक्षात ठेवा.यावेळी प्रमुख पाहुणे विभागीय शासकीय ग्रंथालयातील संचालक सुनील हुसे यांनी स्पर्धा परीक्षेतील ग्रंथालय व संगणक, इंटरनेटच्या वापरातील उपयुक्तता स्पष्ट केली , तर प्रा डॉ. समाधान सातव यांनी लेखन संभाषण कौशल्याचा स्पर्धा परीक्षेतील वापराविषयी मार्गदर्शन केले . प्रारंभी कार्यशाळेचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.नवनाथ गोरे यांनी केला , अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. व्ही.के .खिल्लारे यांनी विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून न जाता सदैव उच्च विचार व विधायक कार्यात स्वत:ला गुंतवून घेण्याचा सल्ला दिला. यावेळी उपप्राचार्य प्रा.एन.एम करडे , डॉ. आर.व्ही.मस्के, डॉ. बी.एन . शिंदे , डॉ. एस.पी.खिल्लारे , डॉ. व्ही. जी . पिंगळे , डॉ. एस.पी. बुधवंत अधिक्षक राजू पट्टेकर यांची प्रमुख उपस्थिती होती .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतीश वाघमारे यांनी तर आभार डॉ. संघरत्न गवई यांनी केले . यावेळी सर्व प्राध्यापक , विद्यार्थी कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलक:- (७१) विशेषज्ञ

श्री गुरुजींची कलकत्ता येथे काही प्रतिष्ठीतां सोबत बैठक होती. तिथल्या एका प्रौढ डॉक्टरचा व गुरुजींचा संवाद.

डॉक्टर:- आपल्या रा.स्व. संघाचा हिंदू राष्ट्रवाद आम्हाला मान्य आहे. पण एवढे मोठे ध्येय साध्य करण्यासाठी दक्ष-आराम, दंड, खड्ग, शूल, कबड्डी अशा क्षुद्र कार्यक्रमांनी, शाखा चालवण्याने ध्येय साध्य होईल का ?

गुरुजी:- (हसत हसत) डॉक्टर साहेब वर्तमानात ॲलोपॅथीचा मास्टर ड्रग कोणता आहे.

डॉक्टर:- पेनिसिलिन

गुरुजी:- पेनिसिलिन कशापासून बनतं.

डॉक्टर:- सर्वच लोक जाणतात ज्या सडलेल्या अन्नाच्या दुर्गंधीलाही आम्ही लोक पसंत करत नाही; त्यापासून पेनिसिलिन बनवतात.

गुरुजी:- याचा अर्थ हा झाला की योग्य लोकांच्या हातात गेलेल्या खराबीचा पण सदुपयोग होऊ शकतो

डॉक्टर:- हो, बरोबर आहे पण तरीसुद्धा

गुरुजी:- तरीसुद्धा शंका नको आम्ही तेच आहोत; here we are the experts in the science of organisation. संघटन विशेषज्ञ क्रमश:

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# सोयगाव येथे महिला मेळावा व मीनाक्षी बिराजदार यांचा सत्कार समारंभ संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ मार्च

सोयगाव शहरातील कोविड सेंटर येथे महिला मेळावा व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.हा कार्यक्रम गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता स्वर्गीय दयानंद बिराजदार यांच्या २१ व्या पुण्यतिथी निमित्ताने महिला मेळाव्याचे आयोजन व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार २०२२-२३ महाराष्ट्र शासनाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर विभागातून मीनाक्षी बिराजदार यांना मिळाल्याबद्दल त्यांचा सोयगाव तालुक्याच्या वतीने सत्कार सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष पुष्पाताई काळे माजी जिल्हा परिषद सदस्या तथा भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्षा,उद्घाटक सुरेश बनकर भाजपा नेते,प्रमुख पाहुणे इद्रिस मुलतानी प्रदेश चिटणीस,सुनिल गवांडे या कार्यक्रमाचे आयोजक एकात्मिक कृषी व ग्रामीण विकास संस्थाचे सचिव राजकुमार बिराजदार या कार्यक्रमासाठी मुख्य मार्गदर्शक संतोष पाटील राहणार आंबेवडगाव शेतकरी प्रश्नाचे अभ्यासक असे लाभले होते.या



कार्यक्रमासाठी मृदू व जलसंधारण उपविभागीय सूर्यकांत निकम,महेश निकम यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव राजकुमार बिराजदार सोयगाव तालुक्यात गेल्या पंचवीस वर्षापासून संस्थेच्या कार्याची कशी प्रगती आणि लोकांचा सहभाग लोकांनी केलेलं सहकार्य याच्यावर प्रकाश टाकला त्यानंतर स्वर्गीय दयानंद बिराजदार यांच्या जीवनाचा प्रवास आणि त्यांच्या कार्याला उजाळा देण्याचं काम बिराजदार राजकुमार यांनी केले.

त्या कार्यक्रमांमध्ये ज्यांचा सत्कार ठेवण्यात आला होता अशा मीनाक्षी बिराजदार यांनी गेले पंचवीस वर्षे विविध क्षेत्रात महिला सक्षमीकरण दलित आदिवासी वंचित घटकातील लोकांसाठी केलेल्या कामाची दखल महाराष्ट्र शासनाने घेऊन त्यांना उच्च व तंत्रशिक्षण विभाग मुंबई महाराष्ट्र शासन यांच्यावतीने गौरविण्यात आले आणि हा तालुक्यातील लोकांसाठी आनंदाचा क्षण म्हणून सोयगाव तालुक्याच्या वतीने सत्कार समारंभ करण्यात आला. त्यावेळी बचत गटाच्या महिला मोठ्या प्रमाणात हजर होत्या विशेषता जरंडी,गलवाडा,आमखेडा,फर्दापूर,निंबायती, सोयगाव ,कंकराळा,जंगलातांडा,निंभोरा, महालब्धा,तिडका अशा विविध गावातून सरपंच,बचत गटाचे अध्यक्ष,सदस्य राशन दुकानदार महिला,आणि सर्वांच्या वतीने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.उपस्थित महिलांना पुष्पाताई काळे यांनी महिलांच्या सक्षमीकरणावरती मार्गदर्शन केले.त्यानंतर उपस्थित महिलांना मुख्य मार्गदर्शक संतोष पाटील यांनी बाई कामावरून परत कामावर जाते या वाक्यावर खूप असं मोलाचे मार्गदर्शन केलं ज्या कार्यक्षेत्रामध्ये स्वर्गीय दयानंद बिराजदार यांची ज्योत मालवली त्याच कार्यक्षेत्रामध्ये पुन्हा नव्याने संस्थेच्या वतीने कार्याची सुरुवात होऊन आज सगळ्यात हजारो कुटुंबांना रोजगार मिळवून देण्याचे काम संस्थेने केले आहे. आणि पुढेही चालू राहील,व पाणी हा सगळ्यात महत्त्वाचा आज भाग बनलेला आहे मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रश्न भेडसावतो आहे त्यासाठी संस्थेने कामाची सुरुवात केली आहे असे त्यांच्या बोलण्यातून समोर आले अशा विविध विषयाला विविध विषयावरती मार्गदर्शन मान्यवरांचं लाभलेलं आहे या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन संभाजी नागणे,प्रशांत खोडपे यांनी केले कार्यक्रमांमध्ये स्वर्गीय दयानंद बिराजदार यांना आदरांजली वाहण्यात आली. त्याचबरोबर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश बिराजदार,अनिल ठोंबरे,संगीताताई गायकवाड,प्रीती बिराजदार यांचे सहकार्य लाभले,तर या कार्यक्रमाला विविध मान्यवर उपस्थित होते,हा कार्यक्रम राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले.

# वीवो वाय१९ई भारतात लाँच

पुणे - जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड असलेल्या विवोने आज भारतात विवो वाय१९ई लाँच करून आपल्या वाय सीरीज पोर्टफोलिओचा विस्तार केला. या फोनमध्ये ५५००एमएएच ची मोठी बॅटरी, यूनिसोक टी७२२५ ऑक्टा-कोर प्रोसेसर, ४जीबी रैम + ६४ जीबी स्टोरेज आणि आई पी ६४ धूळ आणि पाण्याचा प्रतिकार असून लष्करी दर्जाचा टिकाऊपणा आहे, ज्यामुळे वापरकर्त्यांना एक उत्तम अनुभव मिळतो. आजकाल एआय फीचर्सची वाढती मागणी लक्षात घेता, या स्मार्टफोनमध्ये एआय इरेज आणि एआय एन्हांस सारख्या वैशिष्ट्यांसह १३ एमपी ड्युअल एआय कॅमेरा आहे, जो फोटोग्राफीचा अनुभव आणखी वाढवतो. वीवो वाय१९ई दोन सुंदर रंगांमध्ये उपलब्ध आहे - टायटॅनियम सिल्व्हर आणि मॅजेस्टिक ग्रीन. त्याची किंमत ७,९९९ (सर्व करांसह) ठेवण्यात आली आहे. हा स्मार्टफोन २० मार्चपासून फ्लिपकार्ट, विवो इंडिया ई-स्टोअर आणि सर्व पार्टनर रिटेल स्टोअर्सवर खरेदीसाठी उपलब्ध असेल.

## सुनंदा कुलकर्णी यांचे निधन



येथील सुनंदा नरहरी कुलकर्णी (वय.७०) यांचे शुक्रवार रोजी सकाळी ६:०० वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार रोजी ४:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात,दोन मुल,तीन मुली,सुन,नातवंडे,असा परिवार आहे.ते शशिकांत कुलकर्णी,नितीन कुलकर्णी यांच्या मातोश्री होत,व हितेश कुलकर्णी यांच्या त्या काकू होत.

## नागद वनपरीक्षेत्रात जागतिक वन दिन पक्षी साठी पाणी व दाणा देऊन साजरा झाला

कन्नड :- दि.२१ मार्च - जागतिक वन दिना निमित्त विभागीय वन अधिकारी वन्यजीव मोहन नाईकवाडी सहाय्यक वन संरक्षक विशाल लोंढे,वनपरीक्षेत्र अधिकारी नागद सचिन रामपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी समाधान पाटील, सोपान कोळी वनरक्षक अनिल चव्हाण, बाबासाहेब चव्हाण, गणेश गिरी, कैलास राठोड, रत्ना गायकवाड, अश्विनी लांडे व वनमजूर, वनसेवक यांच्या मदतीने गौताळा अभयारण्यातील वनपरीक्षेत्र नागद येथील सीतानाणी, चौफुली नाका, वननिरीक्षण कुटी, पुरणवाडी धबधबा व सायगव्हाण नाका परिसरात वन्य पक्षांना दाणे व पाणी मिळावे यासाठी ठिकाठिकाणी फूड व पाण्याचे डब्बे झाडांना टांगून वन दिन साजरा करण्यात आला

गौताळा अभयारण्यात येणाऱ्या नागरिकांना वन्यजीवा विषयी सहानुभूती निर्माण होऊन. समाज प्रबोधन व्हावे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून सदर कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला याशिवाय वन्यप्राणी यांना नागद वन परीक्षेत्रात एकूण २२ कृत्रिम पानवाट्यात स्वछ पाणी टाकण्यात आले आहे. जिओ जीवस्य जीवनम या उक्तीची परिपूर्ती खऱ्या अर्थाने वनपरीक्षेत्र नागद यांनी केली आहे अशी सर्वत्र चर्चा होताना दिसत आहे.वनपरीक्षेत्र अधिकारी सचिन रामपुरे यांनी सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने या कालावधीत प्रत्येकाने जमेल त्या ठिकाणी व घरासमोर पक्ष्यासाठी दाणे व पाण्याची व्यवस्था करण्याचे आवाहन केले आहे

## टी.सी व सनद हरवली आहे

विलास ज्ञानोबा कदम रा, जवळा (रु) ता.गंगाखेड जि. परभणी मी गंगाखेड ते नांदेड एसटी बस प्रवास करत असताना माझी दहावी पासची टी सी व सनद बळीराजा उच्च माध्यमिक विद्यालय केरवाडी या शाळेची प्रवासामध्ये हरवली आहे जर कोणास सापडली असेल तर त्यांना योग्य बक्षीस देण्यात येईल. त्यांनी संपर्क साधावा विलास कदम.

मो. ८५३०४९९१५९

# जेलरकडून कैद्याला मारहाण प्रकरणात एमएलसी दाखल

तभा वृत्तसेवा

पैठण दि २१ :- खुले जिल्हा कारागृहाचे तुरुंग अधिकारी भानवसे यांनी शेतकऱ्यांना धमकावल्याचे प्रकरण ताजे असतांना आता तुरुंग अधिकारी यांनी क्षुल्लक कारणावरून एका कैद्याला बेदम बदडल्याचे प्रकरण समोर आले आहे.

चांगल्या वर्तणुकीमुळे पैठणच्या खुल्या कारागृहात आपल्या शिक्षेचे अंतिम दिवस व्यतीत करीत असलेल्या कैद्याला केवळ उपहारगृहात उपवासाचे साहित्य आणण्यासाठी गेल्याने तुरुंग अधिकारी भानवसे यांनी या कैद्यास अमानुष अशी मारहाण केली होती, या प्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात शासकीय दवाखान्यानुसार एमएलसी दाखल करण्यात आली असून मात्र संबंधित कैद्याने तक्रार न दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

ठाणे येथील कैदी दाऊद इलियास शेख हा पैठणच्या कारागृहात चांगल्या वर्तणुकीमुळे आपल्या शिक्षेचे अंतिम दिवस व्यतीत करीत आहे, रमजान महिन्याचा उपवास असल्यामुळे उपास सोडण्यासाठी साहित्य खरेदीसाठी गेलेल्या कायद्यास तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे याने या किरकोळ कारणावरून या कैद्यास अमानुषपणे मारहाण केली होती, मारहाणीचा त्रास होत असल्याने सदर कैद्यास पैठणच्या सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते, मारहाणीची गंभीरता पाहता येथील शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी याबाबतची एम एल सी दि. १६ मार्च रोजी रात्री १२.३० वा. पैठण पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

एमलसी दाखल आहे मात्र प्रकरणात कारागृह प्रशासनाची तक्रार नसल्याने या प्रकरणी मारहाण करणाऱ्या तुरुंग अधिकार्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, याबाबत अधिक माहिती घेतली असता कैद्याने तक्रार देऊ नये म्हणून जेल प्रशासनाने त्याच्यावर मोठा दबाव आणल्याची माहिती समोर आली आहे, प्रकरण गंभीर असून याची दखल जेलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेऊन या प्रकरणी चौकशी करून दोषीवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी होत आहे.


## पाहिजेत

बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसा. बुलडाणा र.नं. ३१७१/९४ द्वारा संचालित
सहकार विद्या मंदिर (इंग्रजी माध्यम) व कनिष्ठ महाविद्यालय
(कायम विना अनुदानित)
धाड, धामणगाव बढे, साखरखेर्डा, बिबी, देऊळगाव राजा, टेभुर्णी, देऊळगाव मही, पिंपळगाव राजा, सिंदखेड राजा, जानेफळ, सुलतानपूर, डोणगाव, उदयनगर, डोंगरखंडाळा, मोताळा - जि.बुलडाणा, फत्तेपूर, ता.जामनेर. जि.जळगांव.

| पदाचे नाव | पात्रता | जागा |
|---|---|---|
| शिक्षक / शिक्षिका | बी.एस. सी. /एम.एस .सी.(गणित)बी.एड | १२ |
| | बी.एस. सी./ एम.एस. सी.(विज्ञान)बी.एड | १२ |
| | बी. ए. /एम.ए.(इंग्रजी ), बी.एड | १६ |
| | एच.एस.सी.डी.एड | २२ |
| | बी. ए. /एम.ए.(हिंदी ), बी.एड | ०४ |
| | बी.ए.बी.पी.एड, | ०७ |
| | कंप्यूटर | ०५ |
| | ड्राईंग , संगीत , ए.टी.डी. (प्रत्येकी १जागा) | ०८ |
| मुख्याध्यापक सा.खेर्डा | एम.एस.सी. बी.एड / एम.ए. बी एड (कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव आवश्यक) | ०१ |
| मुख्याध्यापक इतर शाखा | एम.एस.सी. बी.एड / एम.ए. बी एड (कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव आवश्यक) | ०२ |

टिप:- ज्या शाळेसाठी अर्ज करीत आहात, त्या गावाचे नाव अर्जात नमूद करावे.
(सर्व पदांकरीता अनुभव व इंगजी भाषेवर प्रभुत्व असल्यास प्राधान्य)
पात्र उमेदवारांनी आपले अर्ज इंग्रजीमध्ये स्वहस्ताक्षरात, प्रमाणपत्राच्या साक्षांकित झेरॉक्स, Recent पासपोर्ट साईज फोटोसह ५ एप्रिल २०२५ पर्यंत पाठवावे.
( इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्यांनीच अर्ज करावे )

सौ.कोमल झंवर, अध्यक्षा — बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी, — राधेश्याम चांडक, सचिव

कार्यालय - सहकार विद्या मंदिर (मुख्य शाखा), चिखली रोड, बुलडाणा येथील बुलडाणा अर्बन चॅरिटेवल सोसायटीचे मुख्य कार्यालय बुलडाणा-४४३००१ जि.बुलडाणा. मो.नं.9689333255 , 9011028180
email id - bucscharitable@gmail.com



**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate : SANJAY KISHANRAO KENEKAR
Name of political party : Bharatiya Janata Party
Name of Election : The Maharashtra Legislative Council from the Assembly Member
Name of Constituency : The Maharashtra Legislative Council from the Assembly Member

I SANJAY KISHANRAO KENEKAR, (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending Criminal cases

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | XXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 9434/2020 FIR/291/2020 | Pending | U/s 188, 269 r/w 34 IPC |
| 2. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 7844/2021 FIR No. 79/2021 | Pending | U/s 188 IPC |
| 3. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 1688/2022 FIR No. 573/2021 | Pending | U/s 188, 269, 270 IPC |
| 4. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 7674/2022 FIR No. 654/2021 | Pending | U/s 269, 270 IPC |
| 5. | XX, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 2218/2022 FIR No. 192/2021 | Pending | U/s 143, 188, 269, 270 IPC. Disaster Management Act 51-b |
| 6. | XXllth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 1450/2023 FIR No. 30/2022 | Pending | U/s 269, 270 r/w 34 IPC |
| 7. | XXllth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 7859/2021 FIR No. 154/2021 | Pending | U/s 143, 188, 269, 270 IPC |
| 8. | XXllth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 336/2021 FIR No. 450/2020 | Pending | U/s 143, 188, 269 Of IPC U/s. 59 of Disaster Management Act |
| 9. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 1479/2021 FIR No. 78/2021 | Pending | U/s 143, 147, 186, 188 of IPC |
| 10. | Matter IXth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 4919/2023 FIR No. 671/2021 | Pending | U/s 269, 270 of IPC |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

Place : Mumbai
Date : 18/03/2025

Name & Signature of Candidate
(SANJAY KISHANRAO KENEKAR)